**भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८अंतर्गत अभियोग दाखल करण्यास विहित कालावधीत <u>मंजूरी देण्याबाबत</u>**
**तसेच गट- अ व गट- ब मधील राजपत्रित अधिकारी यांच्या बाबतीत प्रशासकीय विभाग स्तरावर निलंबन आढावा समितीचे गठण**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : अभियो- १३१४/प्र.क्र.८६/११-अ**
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक -३१ जानेवारी, २०१५

**<u>वाचा:-</u>** (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. निप्रआ ११११/प्र.क्र.८६/११-अ, दि. १४ ऑक्टोबर, २०११
(२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग .क्र.अभियो-१३१२/प्र.क्र.३०/पूर्नबांधित-१ दि.१२ फेब्रुवारी २०१३

**<u>प्रस्तावना:-</u>**

महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या नियम, ४ मधील पोटनियम ५ च्या खंड (क) च्या परंतुका नुसार शासकीय कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असेल अशा प्रकरणामध्ये निलंबित कर्मचाऱ्यांच्या निलंबन आदेशात फेरबदल करण्यापूर्वी वा तो रद्द करण्यापूर्वी शासनाने या प्रयोजनार्थ गठीत केलेल्या निलंबन आढावा समितीची शिफारस प्राप्त करुन घ्यावी, अशी तरतूद विहित करण्यात आली आहे. या तरतूदीच्या अनुषंगाने संदर्भाधीन क्रमांक (१) येथील शासन निर्णयान्वये गट-अ व गट-ब मधील कर्मचाऱ्यांसाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली "निलंबन आढावा समिती" गठीत करण्यात आली आहे. सदर आदेशाद्वारे निलंबन आढावा समितीची बैठक दर तीन महिन्यांनी घेण्याबाबत आणि समितीची शिफारस मा. मुख्यमंत्री यांना सादर करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. अधिकाराचे प्रत्यायोजन करणे व निर्णयप्रक्रियेत सुलभता आणून निर्णयप्रक्रिया गतिमान करणे हे शासनाचे धोरण असून गट-अ व गट-ब संवर्गातील फौजदारी गुन्हा दाखल असलेल्या व निलंबित असलेल्या कर्मचाऱ्यांच्या निलंबनाचा आढावा घेण्याकरीता संदर्भ क्र.(१) येथील शासन निर्णयाअन्वये गठीत केलेल्या समितीऐवजी प्रशासकीय विभागाच्या स्तरावर समिती गठीत करुन अशा समितीची शिफारस सक्षम प्राधिकारी यांना सादर करण्याबाबत सूचना देण्याची बाब विचाराधीन होती.

तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम,१९८८ खाली अभियोग दाखल करण्याचे प्रस्ताव सक्षम प्राधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीसाठी पाठविले जातात. भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ च्या कलम १९ मधील तरतुदीच्या अनुषंगाने सक्षम प्राधिकाऱ्याकडून ९० दिवसाच्या विहित कालावधीत अभियोग दाखल करण्यास मंजूरी मिळत नसल्याने सदरची प्रकरणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागास न्यायालयासमोर दाखल करता येत नाहीत, त्यामुळे तपास व न्याय प्रक्रियेमध्ये विलंब होतो. या संदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र.२८/२०१२ दाखल करण्यात आली होती. सदर जनहित याचिकेमध्ये शासनातर्फे दिनांक ०७/०१/२०१३ रोजी शपथपत्र दाखल करून अभियोग दाखल करण्यास मंजूरी देण्याबाबतच्या प्रकरणांमध्ये ९० दिवसांत निर्णय घेण्याचे मान्य करण्यात आले आहे. त्यानुसार भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम,१९८८ अंतर्गत दाखल गुन्ह्यांमध्ये अभियोग दाखल करण्याबाबत प्राप्त प्रस्तावांवर सक्षम प्राधिकारी यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन

विभाग, क्र.अभियो-१३१२/प्र.क्र.३०/पुनर्बांधित-१/११-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१३ अन्वये सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयामध्ये अभियोग दाखल करण्यास मंजूरी देण्याचा निर्णय ९० दिवसात घेणे आवश्यक असल्याची बाब अधोरेखित करण्यात आली आहे. डॉ. सुब्रमणियन स्वामी विरूध्द डॉ. मनमोहन सिंग व इतर या विशेष अनुमती याचिका क्र.२७५३५/२०१० मधील सिव्हिल अपील क्र.११९३/२०१२ मध्ये दिनांक ३१/०१/२०१२ रोजी यावर न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आहे.

शासन निर्णय दिनांक १२/०२/२०१३ च्या आदेशामधील सुचनांच्या पार्श्वभूमीवरदेखील सक्षम प्राधिकारी यांच्याकडून ९० दिवसांच्या विहित कालमर्यादेमध्ये अभियोग दाखल करण्याचे प्रस्ताव मंजूर/ नामंजूर केले जात नाहीत, असे वारंवार निदर्शनास येत आहे. त्याचप्रमाणे क्षेत्रीय स्तरावरील सक्षम प्राधिकाऱ्यांच्या स्तरावर प्रलंबित असलेल्या प्रकरणांचादेखील प्रशासकीय विभागाच्या स्तरावर आढावा घेण्यात येत नसल्याची बाब वेळोवेळी घेण्यात आलेल्या बैठकांवेळी निदर्शनास आली आहे. त्यानुसार अभियोग दाखल करण्यास सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मंजुरीसाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून प्राप्त प्रस्तावांवर कार्यवाही करण्याबाबत पून:निर्देश देण्याची बाबदेखील विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

**०१.** लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावासंदर्भात अभियोग दाखल करण्यास परवानगी द्यावी किंवा कसे याबाबत सक्षम प्राधिकारी यांनी ९० दिवसांच्या मुदतीमध्येच अंतिम निर्णय घेण्याची कार्यवाही पूर्ण करावी.

**०२.** अभियोग दाखल करण्यास परवानगी नाकारण्याचा निर्णय सक्षम प्राधिकाऱ्याने घेतला असल्यास त्याबाबतच्या कारणांसह लाचलुचपत प्रतिबंधक विभागास अवगत करण्यात यावे.

**०३.** शासन निर्णय दिनांक १२/०२/२०१३ मधील मुद्दा क्र.५ (य) अन्वये क्षेत्रीय स्तरावर ज्या प्रकरणात अभियोग दाखल करण्याची परवानगी/मंजूरी नाकारण्याचा निर्णय होईल, अशा प्रकरणातील परवानगी नाकारणारे आदेश त्याबाबतच्या निर्णयासह संबंधित प्रशासकीय विभागाच्या सचिवांना **७ दिवसांच्या कालावधीत माहितीसाठी पाठविण्यात यावेत. तसेच अभियोग दाखल करण्याबाबतच्या प्रलंबित प्रकरणाबाबतचा अहवालदेखील प्रशासकीय विभागाच्या सचिवांकडे पाठवावा. प्रशासकीय विभागांनी ही बाब/माहिती शासनाच्या निदर्शनास आणावी.**

**०४.** अभियोग दाखल करण्यास परवानगी नाकारण्याचा सक्षम प्राधिकरणाने निर्णय घेतला असेल तर, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने संबंधित प्रकरणामध्ये पूर्वी सादर केलेल्या वस्तुस्थिती व्यतिरिक्त नवीन बाब/पुरावा/घटना पुढे निदर्शनास आणल्यानंतरच आदेशाचे पुनर्विलोकन करता येईल अन्यथा केवळ सक्षम प्राधिकरणाने मंजुरी नाकारली या कारणास्तव पुनर्विलोकन करण्याबाबत केलेल्या विनंतीचा विचार करण्यात येऊ नये.

**०५.** शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना बेहिशोबी मालमत्ता, नैतिक अध:पतन, लाचलुचपत, खून, खुनाचा प्रयत्न, बलात्कार या व अशा गंभीर प्रकरणात, फौजदारी गुन्हा दाखल झाल्यामुळे निलंबित करण्यात आले असेल तर निलंबनाच्या दिनांकापासून एक वर्षानंतर प्रकरणांचा नियतकालिक आढावा घेण्यासाठी दि. १४/१०/२०११ च्या शासन निर्णयान्वये गट- अ व गट- ब (राजपत्रित) अधिकाऱ्यांसाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली व गट- क व गट- ड साठी क्षेत्रीय स्तरावर महसूल विभागवार विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली निलंबन आढावा समिती गठीत करण्यात आली आहे.

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १४/१०/२०११ मधील २ (i) अनुसार मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील समितीपुढे विचारार्थ सादर करण्यात येणाऱ्या प्रस्तावांसंदर्भात सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे निकष विचारात घेण्यात येतात.

(१) संबंधित अधिकारी यांच्याविरुध्द सक्षम न्यायालयात अभियोग चालविण्यास सक्षम प्राधिकाऱ्यांनी मंजुरी दिलेली असावी.

(२) संबंधित अधिकारी यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात येऊन दोषारोपपत्र बजावण्यात आलेले असावे.

(३) संबंधित अधिकारी यांचा निलंबन कालावधी १ वर्षाहून अधिक झालेला असावा.

वरील निकषांची पूर्तता होत असल्यास अशा प्रकरणांमध्ये सकारात्मक विचार करण्यात येतो.

०६. सबंधित प्रशासकीय विभागांनी वरील कार्यपध्दतीप्रमाणे कार्यवाही केल्यास विहित कालमर्यादेत अशा प्रकरणावर कार्यवाही होणे आणि सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेऊन अशा प्रकरणांचा वेळीच निपटारा करण्यास मदत होईल. याकरिता मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती ऐवजी प्रशासकीय विभाग स्तरावर निलंबन आढावा समितीचे गठण करुन अशा समितीमार्फत निलंबित अधिकारी यांच्या निलंबनाचा आढावा घेण्यासाठी समिती गठित करण्यात यावी, अशा सूचना या शासन निर्णयान्वये देण्यात येत आहेत.

०७. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १४/१०/२०११ मधील २ (i) येथील मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील समितीऐवजी संबंधित प्रशासकीय विभागाच्या अ.मु.स./प्र.स./ सचिव यांच्या अध्यक्षतेखाली त्या त्या प्रशासकीय विभागाच्या अखत्यारीतील राजपत्रित गट-अ व गट-ब च्या अधिकाऱ्यांचे निलंबन आढावा घेण्याबाबत मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांचे स्तरावर "निलंबन आढावा समिती" पुढील प्रमाणे गठीत करण्यात यावी.

**<u>गट -"अ" व गट -"ब" कर्मचाऱ्यांबाबत प्रशासकीय विभाग स्तरावरील निलंबन आढावा समिती</u>**

| | | |
|---|---|---|
| १. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव | : | अध्यक्ष |
| २. अतिरिक्त पोलीस महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | : | सदस्य |
| ३. उप सचिव/सहसचिव (गृह विभाग) | : | सदस्य |
| ४. मंत्रालयीन विभागाचे उपसचिव (विभागीय चौकशी) | : | सदस्य सचिव |

०८. या समितीने शासन निर्णयातील परिच्छेद ०५ मधील कार्यपध्दतीचे पालन करुन निलंबित अधिकाऱ्यांच्या प्रकरणांचा आढावा घ्यावा आणि समितीच्या शिफारशी असे निलंबन करण्यास अथवा मागे घेण्यास सक्षम प्राधिकारी यांना सादर कराव्यात. तद्नंतर, निलंबित शासकीय सेवकास सेवेत पुन:स्थापित करणे व अकार्यकारी पदावर नेमणूक करणे या संदर्भातील शासन सूचनांनुसार कार्यवाही करावी.

०९. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून प्राप्त झालेल्या व विभागाकडे ९० दिवसापेक्षा जास्त कालावधीसाठी प्रलंबित असलेल्या अभियोग मंजूरीच्या प्रकरणांचा, निलंबित अथवा निलंबनाशिवाय पून:स्थापना /नेमणूक करताना अकार्यकारी पदावर नियुक्ती आहे किंवा कसे याची तपासणी करणे, लाचलुचपत/फौजदारी प्रकरणात न्यायालयाने शिक्षा केलेल्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करणे या बाबींचा आढावा घेऊन संबंधितांना जलद निपटारा करण्याबाबत कार्यवाही करावयाच्या सूचना समितीने द्याव्यात.

१०. गट-क व गट-ड मधील कर्मचाऱ्यांबाबत अभियोग दाखल करण्याच्या क्षेत्रीय स्तरावरील प्रलंबित प्रकरणांचा संबंधित प्रशासकीय विभागाच्या सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील समितीने, प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवडयात आढावा घ्यावा व त्यासंदर्भातील अहवाल मुख्य सचिव तसेच अपर मुख्य सचिव, गृह विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेपर्यंत पाठविण्यात यावा.

११. वरील सुधारणांव्यतिरिक्त शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १४/१०/२०११ व दिनांक १२/२/२०१३ मधील अन्य तरतुदींमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही, त्या तशाच लागू राहतील.

१२. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, त्यांनी या सूचना त्यांच्या आधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणाव्यात.

१३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१५०१३११७१६२८७७०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bhagwan Sahai

Digitally signed by Bhagwan Sahai
DN: c=IN, o=All India Service, ou=IAS, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Bhagwan Sahai
Date: 2015.01.31 18:16:35 +05'30'

**( डॉ . भगवान सहाय )**
**अपर मुख्य सचिव (सेवा), महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक,
शासनाचे मुख्य सचिव/ सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव,
महासंचालक,लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,वरळी,मुंबई.
* प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
* सचिव, महाराष्ट्र विधानसभा /विधान परिषद सचिवालय, मुंबई
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
* आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवडनस्ती.

*** पत्राने**